# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील उद्यान विभागाच्या परिमंडळ-३ मधील एच/पूर्व विभागामधे जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषद २०२५ साठी सांताक्रुझ पूर्व येथील वाकोला उड्डाणपुलावर शोभेच्या झाडांच्या कुंड्या ठेवून सुशोभिकरण करण्यासाठी शोभेच्या झाडांच्या कुंड्यांचा पुरवठा करण्यासाठी म.न.पा. अधिकृत ठेकेदार यांच्याकडून अर्ज मागवित आहे.

म.न.पा. अधिकृत ठेकेदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/ पूर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) एच/पूर्व विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा अर्ज फी मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पूर्व' विभाग यांच्याकडे भरणा केल्यानंतर उपलब्ध होईल व ईसारा अनामत रक्कम यशस्वी कंत्राटदाराकडून स्वतंत्रपणे भरून घेण्यात येईल.

म.न.पा. अधिकृत ठेकेदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. २५.०४.२०२५ ते दि. २८.०४.२०२५ रोजी संध्याकाळी ३:०० वाजेपर्यंत आहे. म.न.पा. अधिकृत ठेकेदाराने अर्ज दि. २८.०४.२०२५ रोजी संध्याकाळी ३:०० वाजे पर्यंत जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत ठेकेदाराची मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि.२८.०४.२०२५ रोजी संध्याकाळी ३:०० नंतर अर्ज स्विकारते जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक.२८.०४.२०२५ रोजी दुपारी ०४.०० नंतर सहा.उद्यान अधिक्षक (एच/पूर्व) यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत ठेकेदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडतीकरिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत ठेकेदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत ठेकेदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहा.उद्यान अधिक्षक एच/पूर्व यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त एच/पूर्व विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारली जाणार नाही.

**सहाय्यक उद्यान अधिक्षक (एच/पूर्व)**